**रे. मु. नं. २७/२०२४**
**शेख रफिक वि. सै.जाबिर**
**निशाणी २३ खाली**

**<u>वादी पक्षातर्फे साक्षीदार क्र. २ गणेशराव ज्ञानदेवराव ठाकरे याची उर्वरित सरतपासणी शपथेवर सुरू</u> — <u>वादीतर्फे विधिज्ञ श्री. ए. आर. कट्टा यांच्यामार्फत</u> —**

६. आता मला अभिलेखावर दाखल दि. २७/०४/१९९८ रोजीचे निशाणी १९ वरिल खरेदीखत दाखवण्यात आले. सदर खरेदीखतात नमुद जागा माझी होती. सदर खरेदीखतानुसार मी माझी जागा वादीला विकली होती. सदर जागा मी वादीला रू.३२,०००/— मध्ये विकली होती. मी वादीला विकलेल्या जागेचे वर्णन मला सांगता येईल. सदर जागाचे क्षेत्रफळ ३२ बाय ३२ होते. ती उत्तरेकडील जागा होती. सदर जागेची तत्कालिन चतु:सिमेनुसार पुर्वेस राठोडची जागा, पश्चिमेस रस्ता, उत्तरेस रस्ता व दक्षिणेस माझी उर्वरित जागा होती. सदर जागेचा मोबदला रू. ३२,०००/— मला मिळाला होता. सदर जागा विकल्यामुळे त्यावर आता वादीचा ताबा आहे. सदर खरेदीखतावर माझी 'खरेदी देणार' म्हणुन सही आहे. सदर खरेदीखतावेळी साक्षीदार म्हणुन रामलाल हजर होता.

७. मी वाद मिळकतीचा पुर्वीचा मालक होतो. वाद मिळकत मी दि. १८/०६/१९८३ रोजी सुरेश बंकटराव पिंजरकर याचेकडुन नोंदणीकृत खरेदीखतान्वये रू. १,०००/— ला विकत घेतली होती. सदर खरेदीखताची मुळ प्रत पुणे येथील नोंदणी कार्यालयात पाठविण्यात आलेली होती परंतु ती परत आलीच नाही.

८. दि. १४/१२/१९८७ रोजीच्या खरेदीखतानुसार मी वाद मिळकत मिराताई सुधाकरराव झांबरे यांना रक्कम रू. १,०००/— च्या मोबदल्यात विकली होती. सदर खरेदीखताची मुळ प्रत देखील पुणे येथील नोंदणी कार्यालयात पाठविण्यात आलेली होती परंतु ती परत आलीच नाही.

९. दि. २५/०१/१९९५ रोजीच्या खरेदीखतानुसार वाद मिळकत मी पुन्हा मिराताई सुधाकरराव झांबरे हिचेकडुन विकत घेतली होती. सदर खरेदीखताची मुळ प्रत देखील पुणे येथील नोंदणी कार्यालयात पाठविण्यात आलेली होती ती मला १५ दिवसांपुर्वी प्राप्त झालेली आहे. सदर मुळ प्रत मी दाखल करण्यास तयार आहे.

१०. दि. ०५/१२/१९९८ रोजीच्या खरेदीखतानुसार मी वाद मिळकत गजानन अजबराव झांबरे याला विकली होती. सदर खरेदीखताची मुळ प्रत देखील पुणे येथील नोंदणी कार्यालयात पाठविण्यात आलेली होती परंतु ती परत आलेली नाही.

**( उर्वरित सरतपास वादीतर्फे तोंडी विनंतीवरून पुढील तारखेपावेतो तहकुब )**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**

दि. ०६.०३.२०२६ (ए.ए. माळी)
अकोट २रे सह दिवाणी न्यायाधीश,
अकोट, जि. अकोला.